आ. चिखलकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

लोहा : आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा येथील डी. के. पाटील इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. संस्थापक दिगंबरराव क्षीरसागर, प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. नरेंद्र पत्रे, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याची प्रतिज्ञाही घेतली.

कोईम्बतूर, जयपूर विशेष रेल्वेच्या आठ फेऱ्या

नांदेड / प्रतिनिधी

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेतर्फे गाडी क्रमांक. ०६१८१/०६१८२ कोईम्बतूर. जयपूर. कोईम्बतूर साप्ताहिक विशेष एक्सप्रेस रेल्वेगाडी तात्पुरत्या स्वरूपात चालविण्यात येणार आहे. ही विशेष गाडी एलएचबी रचनेतील २० डब्यांसह चालविण्यात येईल. गाडीची सेवा पुढीलप्रमाणे राहील : गाडी क्र. ०६८१ कोईम्बतूर.जयपूर विशेष १३ ऑगस्ट ते ३ सप्टेंबरदरम्यान प्रत्येक गुरुवारी, एकूण ४ फेऱ्या. कोईम्बतूरहून प्रस्थान वेळ सकाळी २.३० वाजता, जयपूरला शनिवारी दुपारी १३.२५ वाजता पोहोचेल. गाडी क्र. ०६१८२ जयपूर ते कोईम्बतून विशेष १६ ऑगस्ट ते ६ सप्टेंबरदरम्यान प्रत्येक रविवारी, एकूण ४ फेऱ्या. जयपूरहून रविवारी रात्री ११ वाजता निघणार तर कोईम्बतूर येथे बुधवार सकाळी ८.३० वाजता पोहोचेल. ही विशेष गाडी नांदेड विभागातील मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशिम, अकोला स्थानकांवर थांबणार असून राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा व तामिळनाडू राज्यांदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे.

देगलूरमध्ये जुगारी पकडला

देगलूर / प्रतिनिधी

शहरातील रोहिदास चौक परिसरात सुरू असलेल्या 'श्रीदेवी' मटका जुगार अड्ड्यावर देगलूर पोलिसांनी बुधवार दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

देगलूर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी गणेश बालाजी बोदेमवाड (३२) यांच्या फिर्यादीवरून कैलास सुरेश हानमंतकर (४०, रा. पेठ अमरापूर गल्ली, देगलूर) याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ३६७/२०२६ दाखल करण्यात आला आहे. दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास रोहिदास चौक येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपी हा 'श्रीदेवी' नावाचा मटका जुगार खेळत व इतरांकडून खेळवित असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. या कारवाईत आरोपीच्या ताब्यातून ९५० रोख रक्कम तसेच मटका जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. पुढील तपास पोहेकाँ बालाजी पुरी करीत आहेत.

नांदेड वनपरिक्षेत्रातील अवैध प्रकारांची तक्रार केल्यामुळे धमकी

भाजपा पदाधिकाऱ्याची पोलिस अधीक्षकांकडे तक्रार- वैयक्तिक त्रास देण्यासाठी तक्रार- रासने

हदगाव / प्रतिनिधी

नांदेड वनविभागातील अवैध प्रकारांची तक्रार केल्याचा आणि त्याबाबत वृत्त प्रकाशित केल्याचा राग धरून नांदेडचे वनपरिक्षेत्राधिकारी अनिल रासने यांनी मोबाईलवरून धमकी दिल्याबाबतची तक्रार भाजप किसान सभेचे हदगाव तालुकाध्यक्ष विलास महाजन यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांनी नांदेडचे पोलिस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार देत सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांच्याकडे सुद्धा तक्रार केली आहे.

भाजप किसान सभेचे हदगांव तालुका अध्यक्ष विलास महाजन यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ६ जुलै रोजी त्यांनी नांदेड वनपरिक्षेत्रातील राखीव वनक्षेत्रात संबंधित कंत्राटदाराकडून डिंक संकलनासाठी झाडांना मोठ्या प्रमाणात जखमा करून कथितरित्या धोकादायक रसायनांचा वापर केला जात असल्याची बातमी प्रकाशित केली होती. या प्रकरणात वनपरिक्षेत्र अधिकारी आणि काही कर्मचाऱ्यांच्या संगनमताने या प्रकरणात लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचाही आरोप त्यांनी केला होता.

या संदर्भातील वृत्त विविध माध्यमांत प्रसिद्ध झाले होते. तक्रारीनंतर वनपरिक्षेत्राधिकारी अनिल रासने यांनी मोबाईलवर संपर्क साधून तक्रार आणि बातमी का दिली, याबाबत जाब विचारत धमकी दिल्याचा आरोप महाजन यांनी केला आहे. संबंधित संभाषणाची कॉल रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.ी कॉल रेकॉर्डिंग त्यांनी विविध प्रसार माध्यमांना पुरवली आहे. ही कॉल रेकॉर्डिंग फेसबुकवर सुद्धा प्रसारित करण्यात आली आहे. या कथित धमकीप्रकरणी विलासराव महाजन यांनी २७ जुलै २०२६ रोजी नांदेड पोलिस अधीक्षकांकडे तक्रार सादर केली असून, कॉल रेकॉर्डसह संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

तक्रारींचा सूर वैयक्तिक.रासने

तक्रार केली किंवा वृत्तपत्रातून बातमी जरी छापली तरी संबंधितांनी वरिष्ठाकडे पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. महाजन हे वनविभागाच्या राखीव वनक्षत्रात गेलेले नव्हते. ज्यांच्यावर वृक्षतोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला अशा व्यक्तीच्या सांगण्यावरून तक्रार व बातमी दिली. तसेच महाजन यांनी वारंवार माझ्या वैयक्तिक व्हॉट्सअप अकाउंटवर बातम्या आणि तक्रारीचे कात्रण पाठविले. त्यामुळे मी त्रस्त झालो होतो. म्हणून फोन करून प्रत्यक्ष परिस्थिती दाखवण्यासाठी वन विभागात मिळून जाऊ यासाठी नांदेडला या ,असे म्हणालो असे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल रासने यांनी सांगितले.

दहा फूटी अजगराची सर्पमित्रांकडून सुटका

माहूर/ प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील संविधान चौक परिसरात शनिवारी दि. १ ऑगस्ट रोजी रात्री ११ च्या सुमारास तब्बल ९ ते १० फूट लांबीचा अजगर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अचानक समोर आलेल्या अजगरामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ सर्पमित्र श्रीकांत, प्रेमेश्वर आणि संदीप यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच तिघेही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आवश्यक ती खबरदारी घेत अत्यंत कौशल्याने आणि धाडसाने अजगराला सुरक्षितरीत्या पकडले. रेस्क्यूदरम्यान परिसरात मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती.

यानंतर अजगराला कोणतीही इजा न पोहोचवता त्याच्या नैसर्गिक अधिवासात, जवळील जंगल परिसरात सुरक्षित सोडण्यात आले. संपूर्ण बचाव मोहिमेदरम्यान कोणतीही झाली नाही. सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केला. परिसरात साप किंवा अन्य वन्यजीव आढळल्यास घाबरून जाऊ नये, त्यांना मारण्याचा किंवा इजा करण्याचा प्रयत्न करू नये. अशा वेळी तात्काळ प्रशिक्षित सर्पमित्र किंवा वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे.

बॅकवॉटरग्रस्त शेतकऱ्यांचे नांदेडमध्ये धरणे

बरबडा / प्रतिनिधी

तेलंगणातील पोचमपाड धरणाच्या बॅकवॉटरचा फटका नायगाव तालुक्यातील अनेक भागातील शेतीपिकांना अनेक वर्षांपासून बसत आहे. या समस्येमुळे शेकडो हेक्टर शेतीजमीन पाण्याखाली जात असून उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. दरवर्षी नुकसान होऊनही सरकारकडून याची कसलीही दखल घेतली जात नाही. शिवाय मदतही मिळत नाही. खरीप हंगाम वर्षानुवर्षे वाया जात असल्याने या बॅकवाटरग्रस्त शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.शासनाच लक्ष वेधण्यासाठी या भागातील शेतकऱ्यांनी दि.५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर डॉ.भगवानराव मनुरकर यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलनात सहभागी होत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

जिल्ह्यातील इतर काही तालुक्यासह नायगाव तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या अनेक गावांतील शेतीमध्ये दरवर्षी बॅकवॉटर शिरते.विशेषता बरबडा,पाटोदा,आंतरगाव,वजीरगाव,आदी भागात हे बॅकवाटर मोठ्या प्रमाणात शिरून शेकडो हेक्टर पिकाचे अतोनात नुकसान होत. यासंदर्भात अनेक वेळा महसूल प्रशासन, जिल्हा प्रशासन तसेच राज्य शासनाकडे निवेदने देण्यात आली. पंचनामेही करण्यात आले; मात्र अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नसल्याचा भावना या भागातील शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाने केवळ आश्वासने न देता तातडीने नुकसानभरपाई द्यावी आणि बॅकवॉटरच्या कायमस्वरूपी प्रश्नावर ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी केली आहे.

नांदेडच्या महामोर्चात २०० चारचाकी वाहने नेणार-लोहबंदे

मुखेड / प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्यात येऊ नये, तसेच सामाजिक न्याय आणि घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी नांदेड येथे रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चाच्या तयारीला मुखेड तालुक्यात वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर दि. ४ ऑगस्ट रोजी मुखेड येथील शासकीय विश्रामगृहात महामोर्चाच्या नियोजनासाठी दुसरी आढावा बैठक पार पडली.

बैठकीत मुखेड शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी वाहन व्यवस्था, गावनिहाय जनसंपर्क, कार्यकर्त्यांचे नियोजन, जनजागृती मोहीम आणि विविध संघटनांच्या समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रत्येक गावात संपर्क वाढवून अधिकाधिक नागरिकांना महामोर्चात सहभागी करून घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. बैठकीत मुखेड तालुक्यातून किमान २०० चारचाकी वाहने नांदेडकडे रवाना करण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती

बाजार संचालक व्यंकटराव लोहबंदे यांनी दिली आहे

तसेच पुढील एक-दोन दिवसांत विविध सर्कल व गावांना भेटी देऊन आणखी नागरिकांना सहभागी करवून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे त्यामुळे मुखेड तालुक्यातून विक्रमी सहभाग नोंदविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे आयोजकांनी सांगितले. बैठकीस उत्तम बनसोडे,मनोज कांबळे सावरगावकर ,आकाश कांबळे बेळीकर (भीमशक्ती), गंगाधर सोंडारे (भारतीय बौद्ध महासभा), डॉ. राहुल कांबळे (पशुचिकित्सक संघटना), मोहन गायकवाड हिब्बटकर, विजय लोहबंदे (एसएफआय), पवन कांबळे येवतीकर (वंचित बहुजन आघाडी), अविनाश कांबळे (भारतीय बौद्ध महासभा), अशोक वाघमारे (सरपंच, मांजरी), साहेबराव वाघमारे (सरपंच, चांडोळा), कुणाल कांबळे (सरपंच, होनवडज), कमलाकर घोडके (माजी सरपंच, बोमनाळी),माधव होनमाने, अण्णा जहिरे, गोविंद भालके, संजय वाघमारे, बालाजी वाघमारे, अशोक गोणारे,माधव देवके, विविध सामाजिक, राजकीय व बौद्ध संघटनांचे पदाधिकारी, सरपंच, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीचे आयोजन अनिल सिंरसे (रिपब्लिकन सेना) यांचे पुढाकारातून झाले. बैठकीत उपस्थितांनी अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणास तीव्र विरोध व्यक्त करताना, आरक्षणात कोणतेही उपवर्गीकरण करण्यात येऊ नये, सामाजिक न्याय, संविधानाने दिलेले समान हक्क आणि अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे संरक्षण ही प्रमुख मागणी असल्याचे स्पष्ट केले. तसेच अनुसूचित जातींच्या हक्कांशी संबंधित इतर प्रलंबित मागण्यांवरही शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. महामोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन संवैधानिक अधिकारांच्या संरक्षणासाठी एकजूट दाखविण्याचे आवाहन उपस्थितांनी केले.आरक्षणाचे उपवर्गीकरण करु नये, आरक्षणाला घटनात्मक संरक्षणाची हमी द्यावी. सामाजिक न्याय व संविधानिक अधिकारांचे संरक्षण करावे अशा मागण्या असल्याचे मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व्यंकटराव लोहबंदे यांनी सांगितले.

छापील किंमतीपेक्षा जादा दराने खत विक्रीची तकार ; चौकशीची मागणी

उमरी / प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर उमरी तालुक्यात रासायनिक खतांची छापील (एमआरपी) किमतीपेक्षा अधिक दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना खतांसाठीही अधिक पैसे मोजावे लागत असल्याचा आरोप होत आहे.

शेतकरी आणि काही खत विक्रेत्यांच्या म्हणण्यानुसार, जीएसटीच्या कररचनेमुळे काही खतांचे वेगवेगळे दर लागू होत असल्याने विक्रीदरात तफावत निर्माण होत आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांचा दावा आहे की, खताच्या पोत्यावर छापील असलेल्या कमाल किरकोळ किमतीपेक्षा (एमआरपी) अधिक रक्कम आकारली जात असून यामुळे त्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे.

या पार्श्वभूमीवर उमरीतील काही खत विक्रेत्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन दराबाबत शासनाने स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणी केली आहे. व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, कररचनेतील फरकामुळे ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून त्यावर शासनाने एकसमान धोरण जाहीर करावे.

कारवाई करु -मिराशे

तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिराशे यांनी सांगितले की, खताच्या पोत्यावर नमूद केलेल्या छापील किमतीनुसारच विक्री होणे बंधनकारक आहे. छापील दरापेक्षा अधिक दराने खत विक्री होत असल्याचे आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.दरम्यान, काही शेतकरी प्रतिनिधींनी सांगितले की,तालुका कृषी विभागातील खत विक्रीवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या गुणनियंत्रण अधिकाऱ्यांकडून पुरेशी तपासणी होत नसल्याने काही ठिकाणी गैरप्रकारांना वाव मिळत आहे. या आरोपांची स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांची बाजू अद्याप समोर आलेली नाही.कृषी विभागाने तालुक्यातील सर्व खत विक्री केंद्रांची विशेष तपासणी मोहीम राबवून छापील किमतीपेक्षा अधिक दर आकारणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच दरांबाबत पारदर्शकता आणण्यासाठी नियमित तपासणी आणि जनजागृती करावी, अशी मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे.

आ. चिखलीकर यांचा आजमवाडी ग्रामस्थांशी संवाद

दीड किमी रस्ता होणार ; वर्ग खोलीसाठी १४ लाख

लोहा / प्रतिनिधी

तालुक्यातील किरोडा आजमवाडी या रस्त्याचे काम लवकरच करू तसेच शाळेच्या वर्ग खोलीसाठी १४ लाख रुपये देण्याचे पत्र दिले तसेच ग्रामस्थांशी विविध विषयांवर आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी चर्चा केली. उपोषण करणे योग्य आहे पण त्यात विकासासाठी राजकारण करणे अयोग्य असल्याचे असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले

आजमवाडी येथे चऊतराबाई बालाजी मुंडे यांचे निधन झाले त्याच्या कुटुंबियांचे आ. चिखलीकर यांनी गुरुवारी दि. ६ ऑगस्ट रोजी सांत्वन केले. त्यानंतर ग्रामस्थांशी त्यांनी चर्चा केली. यावेळी नायब तहसीलदार डॉ. संदीप हाडगे, सा. बां. विभागाचे उपकार्यकरी अभियंता सुमित पाटील, जि. प. बांधकाम

उपविभागीय अभियंता शिवाजी राठोड, अभियंता श्रीकांत गुंडावार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी उपनगराध्यक्ष दता वाले, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील पाटील इंगळे, नगरसेवक भास्कर पवार, हरिभाऊ चव्हाण, श्याम पाटील पवार, तुकाराम दाढेल, शंकर वट्टमवार, बाजार समितीचे संचालक साहेबराव काळे, ग्रा. पं. सदस्य अभंग गाडेकर, माजी सरपंच अशोक गीते, भानुदास कागणे, मोहन मुंडे, तानाजी कागणे, बालाजी मुंडे, परमेश्वर मुरकुटे यासह पदाधिकारी उपस्थित होते

आ. चिखलीकर यांनी ग्रामस्थांशी अनौपचारिक चर्चा केली. किरोडा रस्ता ते आजमवाडी हा दीड किमी रस्ता करून देण्याचे जाहीर केले तसेच बांधकाम विभागाला तत्काळ अंदाजपत्रक तयार करण्याचे निर्देश दिले. शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. वर्ग खोलीसाठी १४ लक्ष रुपयांचा निधी दिला. तसेच ग्रामस्थांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या

मंत्री पंकजाताई यांनी गाव पुढाऱ्यांना सुनावले

गावासाठी रस्त्या व्हावा यासाठी एक शिष्टमंडळ राज्याच्या नेत्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे गेले. त्यांनी हा रस्ता आ. चिखलीकर हेच करू शकतात अन्य कोणी नाही, असे सांगतानाच त्यांनी गावखेड्यात जातीयवाद करू नका. त्याचा परिणाम आम्हाला सहन करावा लागत आहे. त्यामुळेच मी पराभूत झाले होते, या शब्दात पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी या शिष्टमंडळाला सुनावले असल्याची माहिती मिळाली आहे.

मनवा फरकंडेचे सुयश

लोहा : ग्रो ॲन्ड ग्लो पब्लिक स्कूल कंधार येथील गुणवंत विद्यार्थीनी मनवा मंगेश फरकंडे हिने श्रेया इंटेलिजीयंट अकॅडमी सर्च परीक्षा १०० पैकी ९४ गुणाने उत्तीर्ण केली आहे. मनवाने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. तिच्या यशामागे आई-वडिलांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे योग्य नियोजन तसेच कुटुंबीयांचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरल्याची भावना व्यक्त होत आहे. तिचे आजी, आजोबा, आई, वडिल,गुरुजनांनी कौतुक केले आहे.मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचा गौरव केला आहे.

कुरेश एज्युकेशन सोसायटीद्वारा संचलित, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त 100% अनुदानित

कुरेशीया हायस्कूल बारा इमाम रोड,नांदेड

शिक्षक सेवक पाहिजे

कुरेश एज्युकेशन सोसायटी,नांदेड संचलित **कुरेशीया हायस्कूल बारा इमाम रोड नांदेड** येथे एक शिक्षक पद भरती करायची आहे. उमेदवार बी.ए.,बी.एड. उत्तीर्ण व टी.ई.टी./सी.टी.ई.टी.पात्र होतकरु असणे आवश्यक आहे. इच्छूक उमेदवारांनी आपले कागदपत्र व प्रमाणपत्रासहित मुलाखतीसाठी शाळेत **दि.14/08/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता** उपस्थित रहावे.

मो. 9096182926, 9325612178

स्वाक्षरीत/-
मुख्याध्यापक,
कुरेशीया हायस्कूल,नांदेड.

बँक ऑफ इंडिया

नातं बँकींग पलिकडचं...

वसुली विभाग - सोलापूर आंचलिक कार्यालय
सह्याद्री शॉपिंग सेंटर, जुना एम्प्लॉयमेंट चौक,
सोलापूर -४१३००१. फोन : ०२१७२-२३१९४७६
इमेल : Solapur.ARD@bankofindia.bank.in

रुल ८(६) आर/डब्ल्यु ९(१)
स्थावर मालमत्तेचा विक्री सुचना

ई लिलाव द्वारे स्थावर मिळकतींची विक्री नोटीस : सिक्युरीटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट २००२, सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल २००२ मधील तरतुद कलम 8(6)

ई लिलाव दिनांक व वेळ : दि.२५ ऑगस्ट २०२६ स.११ ते सायं.५ पर्यंत (भारतीय प्रमाण वेळेनुसार)

तमाम नागरिकांना, विशेषत: कर्जदार व जामीनदार यांना सुचना देण्यात येते कि कर्जदार/जामीनदार यांच्याकडुन येणे रक्कम बाकी पोटी बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी यांनी नमुद स्थावर मालमत्तेचा ताबा घेतला असुन सदर मालमत्तांचा ई-लिलाव द्वारे ''जेथे आहे तेथे, जसे आहे तसे, जेवढे आहे तेवढे '' या तत्वावर दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी विक्रीस काढली आहे ज्याचा तपशील खालील प्रमाणे आहे

अ. क्र.	प्रकार	जागेचे तपशिल	शाखा कर्जदाराचे/जामीनदाराचे नाव	मालमत्तेचे सविस्तर वर्णन	राखीव किंमत रु./ अनामत बयाणा रक्कम	एकुण येणे बाकी + व्याज + इतर खर्च	प्रोपर्टी इनस्पेकशन तारीख/वेळ प्राधिकृत अधिकारी नांव व मोबाईल क्र.
०१.	फ्लॅट (प्रतिकात्मक ताबा)	मु.पो.वाडी बु, ता.व जि.नांदेड ४३१६०५	**व्हीआयपी रोड नांदेड शाखा** सौ.योगीता नतेश परदेशी (कर्जदार) श्री.राजेशसिंग अशोकसिंग चव्हाण (जामीनदार)	फ्लॅट नं.३०१, तिसरा मजला, ओम साई अपार्टमेंट, प्लॉट नं.२,३,४ सर्व्हे नं.१७/ए/३ भाग, वाडी बु, ता.व जि.नांदेड-४३१६०५ येथील सौ.योगीता नतेश परदेशी यांच्या मालकीची जागा व इतर साहित्य एकुण कार्पेट क्षेत्रफळ ५९.३६ स्क्वे.मी	रु.१९.०० लाख इएमडी रु.१,९०,०००/-	रु.२०.२८ लाख + व्याज व इतर खर्च दि.२९.०९.२०२५ पासुन	तारीख : दि.१८/०८/२०२६ वेळ : स.११ ते दु. ४ पर्यंत श्री. महीराला रंजीथ कुमार (मुख्य प्रबंधक) फोन : 02382-245252; मो : 8639549526 Latur,Solapur@bankofindia,bank,in

सर्व नियम व अटी विषयी जाणुन घेण्यासाठी कृपया पुढील सांकेतीक स्थळांवर भेट द्या https://baanknet.com/eauction-psb/home Secured website i.e.https://bankofindia.bank.in//and/or https://BAANKNET.com इंग्रजी व मराठी जाहिरातींच्या मसुद्यात विसंगती आढळल्यास इंग्रजी जाहिरातीचा मसुदा अंतिम ग्राह्य धरला जाईल

Jhaveri

दि.०७.०८.२०२६
स्थळ : सोलापूर

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया